ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# दलित आत्मकथनांचे भाषिक स्वरूप

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय,
नागपूर.

**प्रास्ताविक :**




दलित आत्मकथन हा दलित साहित्याचा प्राणभूत साहित्यप्रकार म्हणून ओळखला गेला आहे. दलित लेखकांच्या प्रगल्भ जीवनजाणिवांचा कलात्मक आविष्कार दलित आत्मकथनांच्या रुपाने मराठी साहित्यात झालेला आहे. दलितांच्या जगण्याची विविधांगे खऱ्या अर्थाने आत्मकथनांच्या रूपाने साकार झाली, तेव्हा दलित आणि दलित्तेतर यांच्या जगण्यातील विभिन्नता प्रत्ययास आली. दलित सुशिक्षित तरुणांनी आपल्या जगण्यातील वैफल्यग्रस्तता आत्मकथनाच्या रूपाने साकार केली आणि मराठी साहित्याला अपरिचित असणाऱ्या जीवन जाणिवांचा नव्याने परिचय करून दिला. आत्मकथन हा साहित्य प्रकार वाचकांच्या अभिरुचीला पूरक ठरलेला दिसून येतो. माणसांच्या जगण्यातील कारुण्यता किती भयावह असू शकते याचा जिवंत पट आत्मकथनाच्या रूपाने उलगडत गेला. ही आत्मकथने आपले वेगळेपण सिद्ध करण्यास तयार झाली, ती भाषा या लेखन प्रकाराच्या मूलभूत घटकामुळे. दलित आत्मकथनातून साकार झालेली भाषा खऱ्या अर्थाने दलितांच्या जगण्याचे अनेक पदर अत्यंत व्यापकतेने साकार करणारी ठरली. म्हणूनच आत्मकथनातून साकार झालेल्या भाषेचे स्वरूप हे आशया इतकेच महत्त्वाचे आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नसावी. प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने दलित आत्मकथनांच्या भाषेचे स्वरूप थोडक्यात विचारात घेता येईल.

भाषा हा कोणत्याही साहित्य प्रकाराचा प्राणभूत घटक असतो. भाषेच्याद्वारेच लेखक आपल्या अनुभवाची अभिव्यक्ती करीत असतो. या अभिव्यक्तीतील विविधता आणि वेधकता अधोरेखित करण्याचे काम खऱ्या अर्थाने भाषेमुळेच सिद्ध होते. दलित साहित्यात अत्यंत नावारूपाला आलेल्या आत्मकथन या साहित्यप्रकाराच्या भाषेचे वेगळेपणही या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. दलित आत्मकथने ही दलित साहित्याचा सर्वोत्तम अविष्कार मानली जातात. ती भाषा या घटकामुळेच. दलित आत्मकथनातून साकार झालेली भाषा समाजव्यवस्थेने नाकारलेल्या माणसाच्या जगण्याला मुखर करण्यासाठी सिद्ध झालेली दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात अत्यंत लोकप्रिय झालेल्या दलित आत्मकथनांची भाषा ही समाजाभिमुख व लोकाभिमुख असल्यामुळे खऱ्या अर्थाने आत्मकथने वाचकांच्या अभिरुचीस सिद्ध झालेली होती. भाषा या महत्त्वाच्या घटकामुळे कलाकृतीही विविधात्मकता धारण करून अनुभवाला अधिकाधिक सखोलतेने साकार करीत असते. भाषा ही सामाजिकतेच्या मुशीतून साकार झालेली असल्यामुळे ती कलाकृतीच्या आणि सामाजिक जीवनाच्या अनुबंधाला कशी एकरुप करते ते लिहिताना रा.ग.जाधव म्हणतात,''साहित्याच्या सामाजिकतेची सर्वात महत्त्वाची बाजू म्हणजे भाषा! समाजात जी साहित्यनिर्मिती होत असते ती अर्थातच

समाजाच्या भाषेतून होत असते आणि भाषाही समाज निर्मित असते. समाजाविना भाषा संभवतच नाही. समाजाचा सर्व व्यवहार भाषेतून होत असतो व दीर्घकालीन अशा वापरातून भाषेचे स्वरूप सिद्ध झालेले असते. पण भाषा म्हणजे केवळ अक्षरांची चिन्हे नव्हेत. अक्षरांची जुळणीही नव्हे, अक्षरे ज्या शब्दांना घडवितात त्या शब्दांना समाजात खास अर्थपूर्णता लाभलेली असते. ही अर्थपूर्णता सामाजिक अनुभवांच्या विचारविनिमयाच्या आधारे निर्माण झालेली असते.''[१] रा.ग.जाधव यांनी साहित्य आणि समाज यांच्या एकात्मकतेला भाषा कशी सहाय्यभूत ठरते ते स्पष्ट केले आहे. यावरून दलित आत्मकथन ही सामाजिक जीवनाला केंद्रस्थानी ठेवून आणि समाजाची भाषा घेऊनच साकार झालेली होती. म्हणून दलित आत्मकथनांचा भाषा हा एक महत्त्वाचा घटक म्हणावा लागतो.

'बलुतं' या दया पवार यांच्या आत्मकथनापासून मराठी दलित आत्मकथनांची खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली होती. दया पवार यांनी या आत्मकथनातून दलित माणसांच्या जीवन जाणिवा शब्दबद्ध केलेल्या आहेत. या अनुभवांची अभिव्यक्ती करताना दया पवार यांनी 'महार' या समाजात बोलल्या जाणाऱ्या महारी बोलीचा वापर कलात्मकतेने केल्यामुळे त्या समाजाच्या असणाऱ्या जाणिवा, वेदना तीव्रपणे प्रकट झाल्याचे दिसून येते. या आत्मकथनात भाषेच्या अनुषंगाने आपले मत व्यक्त करताना डॉ.संपतराव गायकवाड लिहितात, ''दया पवार यांनी हे आत्मकथन प्रमाणभाषेत लिहिले असले तरी, संवादाच्या पातळीवर महार समाजाची भाषा अभिव्यक्त केली आहे.''[२] डॉ.गायकवाड यांनी अधोरेखित केलेले हे मत बलुतं आत्मकथनातून साकार झालेल्या विशिष्ट बोलीला केंद्रवर्ती ठेवणारे आहे. लेखक प्रमाण भाषेतून आपले अनुभव साकार करीत असला तरी त्याला अनुभवाच्या कक्षा रुंदावण्यासाठी, तो अनुभव अधिकाधिक समाजाभिमुख होण्यासाठी बोलीभाषेचा वापर करणे संयुक्तिक ठरते. हे या ठिकाणी स्पष्ट होते. दया पवारांच्या या आत्मकथनाने मराठीत आत्मकथन लेखनाची एक परंपरा निर्माण केली व पुढे अनेक आत्मकथने लिहिली गेली.

महाराष्ट्राच्या विशिष्ट भौगोलिक प्रदेशात वास्तव्यास असणाऱ्या वेगवेगळ्या भागातील अनेक विविध लेखकांनी आपल्या जीवन जाणिवा आत्मकथनांच्या आधारे साकार केलेल्या आहेत. या आत्मकथनांचा विचार करताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते ती म्हणजे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भूप्रदेशात वास्तव्यास असणारे लेखक आत्मकथनांच्याद्वारे आपला समाज आणि आपले जीवनानुभव या अनुषंगाने आत्मकथनातून अभिव्यक्त होत होते. त्याचबरोबर त्या त्या समाजात बोलली जाणारी बोली भाषा ही त्या आत्मकथनातून साकार झालेली आहे. कर्नाटकाच्या सीमाभागात वास्तव्यास असणारे डॉ.भीमराव गस्ती यांच्या 'बेरड' या आत्मकथनाचा या अनुषंगाने विचार करताना कन्नड भाषेतील अनेक शब्द जे मराठीत रुळलेले आहेत, त्या शब्दांचा सर्रास वापर करून भीमराव गस्ती यांनी प्रमाणभाषा, बोलीभाषा या अनुषंगाने आपले आत्मकथन साकार केलेले आहे. एवढेच नव्हे तर या आत्मकथनातून कानडी भाषा आणि कानडी संस्कृतीही साकार झालेली आहे. बेरड, आऊ, बोरास्नी, उरगा, हेळीद आदी अनेकविध शब्द या आत्मकथनातून आलेले आहेत. तर विदर्भ या भूप्रदेशात वास्तव्यास असणाऱ्या वेगवेगळ्या लेखकांनीही आपल्या जाती—जमातीचे प्रतिनिधित्व करणारे जीवन चित्रण आत्मकथनातून साकार केले आहे. तसेच त्या त्या जमातीत बोलल्या जाणाऱ्या भाषेच्या लकबीही त्या आत्मकथनातून साकार झालेल्या आहेत. कचरू गिऱ्हे यांनी भटक्या जमातीचे चित्रण करणारे आत्मकथन साकार केलेलं आहे. गोपाळ समाजाच्या बोलीभाषेतून साकार झालेलं हे आत्मकथन प्रसंगानुरुप संवाद भाषा व प्रमाणभाषेच्या आधारे साकार झालेले आहे. या आत्मकथनातून अनेक इंग्रजी, हिंदी भाषेतीलही शब्द साकार झालेले दिसून येतात.

मराठवाड्यातील अनेक दलित लेखकांनी आपल्या जीवनानुभवांना आत्मकथनातून साकारले आहे. मराठवाड्याच्या वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्राचे त्या त्या भागातील बोली भाषेचे नमुने घेऊन ही आत्मकथने मराठी साहित्यात आपले वेगळेपण सिद्ध करणारी ठरली आहेत. यामध्ये आठवणींचे पक्षी, गावकी, धूळपाटी, बावळट, दे दान सुटे गिऱ्हाण अशा अनेक आत्मकथनांचा आवर्जून उल्लेख करता येईल. आठवणींचे पक्षी या प्र.ई. सोनकांबळे लिखित आत्मकथनातील एक एक पान जसे उघडत जावे तसे लेखकाच्या भयान वास्तवाची जाणीव वाचकांना होत जाते. आपला गाव, गावचा परिसर आणि परिसरात बोलली जाणारी बोली भाषा केंद्रस्थानी ठेवून प्रईंनी आपला जीवनपट उलगडला आहे. भाषिक वैविध्याचे मुळेच हे आत्मकथन विशेष चर्चिले गेले आहे. या आत्मकथनातून येणारी भाषा उस्मानाबाद, लातूर

परिसरात बोलली जाणारी बोलीभाषा आहे. त्याचबरोबर उदगीर आणि अहमदपूर तालुक्यातील व आंध्रप्रदेशाच्या सीमेवरील बोलीभाषेचे चित्रण या आत्मकथनातून आल्याचे दिसून येते. या आत्मकथनातून साकार झालेल्या भाषेविषयी बोलताना अविनाश सांगोलेकर म्हणतात, ''ह्या आठवणी सांगण्यासाठी सोनकांबळे यांनी मराठवाड्यातील उदगीर भागात जी खास अशी महारी बोली भाषा बोलली जाते तिचा उपयोग केला आहे.''[३] प्र.ई.सोनकांबळे यांच्या आत्मकथनातील भाषेचे नेमके स्वरूप सांगोलेकर यांनी अधोरेखित केलेले आहे. यावरून महार जमातीतील वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात राहणारे लोक खऱ्या अर्थाने आपल्या समाजाचे प्रतिनिधित्व करणारी बोलीभाषा कसे वापरत होते, याचा प्रत्यय आठवणींचे पक्षी या आत्मकथनातून येतो. या भाषिक वैशिष्ट्यांमुळेच आठवणींचे पक्षी हे आत्मकथनपर साहित्यात सर्वश्रेष्ठ ठरलेले आहे.

माधव कोंडविलकर यांचे 'मुक्कामपोस्ट देवाचे गोठणे' हे आत्मकथन म्हणजे त्यांच्या आठ वर्षाच्या आयुष्याची कहाणी आहे. त्यांच्या या आत्मकथनाच्या रूपाने कोकणातील चांभार समाजातील सुशिक्षित, सुसंस्कृत तरुणांच्या जगण्याचे भावविश्व साकार झालेले आहे. या आत्मकथनाने कोकण परिसरात बोलली जाणारी आणि विशेषत: चांभार समाजात बोलली जाणारी बोली भाषा मराठी साहित्याला परिचित करून दिलेली आहे. दैनंदिन जीवनाच्या अनुषंगाने साकार झालेल्या या आत्मकथनातून तडफडणारे, तगमगणारे आणि तरीही सोशिकपणातून सुसंस्कृत मनाचे दर्शन घडविणारे हे आत्मकथन आहे. पुढे या आत्मकथनाच्या परंपरेत ज्या आत्मकथनाने मराठी वाचक मनाचं भरण—पोषण केलं ते आत्मकथन म्हणजे लक्ष्मण माने यांचे 'उपरा' हे आत्मकथन व या आत्मकथनातून कैकाडी या विशिष्ट जमातीतील लोक जीवनाचे विविधांगी चित्रण पहावयास मिळते. प्रमाणभाषेबरोबर कैकाडी बोली भाषेत बोलल्या जाणाऱ्या अनेक म्हणी, वाक्प्रचार आणि विशिष्ट शब्दसौंदर्यांनी हे आत्मकथन सिद्ध झालेले आहे. लेखकाच्या जीवन प्रवासानुसार बदलत जाणारी त्याची भाषा या आत्मकथनातून साकार झालेली दिसून येते. उपरा आत्मकथनात लक्ष्मण माने यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाबरोबर बोली भाषेत आणि एकूणच भाषेत कशा पद्धतीने बदल होत गेला त्या विषयी विवेचन केलेले आहे ते म्हणतात,''अकरावीच्या वर्गात अडचणी काही नव्हत्या. दहावीला गणित, इंग्रजी दांडी मारली होती, अन इंग्रजीशिवाय मॅट्रिकला कोण विचारणार आता समज चांगली आली होती. आता आई—बाला अहोजाहो करीत बोलवीत होतो. भाषेत खूप फरक पडला होता.''[४] लेखकाच्या बदलत जाणाऱ्या भाषेचे स्वरूप या आत्मकथनाच्या पानापानातून सिद्ध झालेले दिसून येते.

या आत्मकथा लेखन परंपरेत उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोटं' त्यानंतर शंकरराव खरात यांचे 'तराळ—अंतराळ', नानासाहेब झोडगे यांचे 'फांजर', रुस्तम अचलखांब यांचे 'गावकी', शरणकुमार लिंबाळे 'अक्करमाशी', दादासाहेब मोरे 'गबाळ', पार्थ पोळके 'आभरान', श्रीरंग तलवारे 'धूळपाटी', तुषार भाग्यवंत 'कोंडाळ', ल.स.रोकडे 'झळा', भीमराव गस्ती 'बेरड', लक्ष्मण गायकवाड 'उचल्या', आत्माराम राठोड 'तांडा', ना.म.शिंदे 'जातीला जात वैरी', बाळासाहेब गायकवाड 'ख्रिस्ती महार', नरेंद्र जाधव 'आमचा बाप आणि आम्ही', डॉ.किशोर शांताबाई काळे 'कोल्हाट्याचं पोर', उत्तम कांबळे 'वाट तुडवताना' या पुरुष आत्मकथाकारांबरोबरच अनेक स्त्रियांनीही दलित आत्मकथने लिहिलेली आहेत. त्यामध्ये शांताबाई कांबळे 'माझ्या जन्माची चित्तरकथा', मल्लिका अमर शेख 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' कुमोद पावडे 'अंत: स्फोट' मुक्ता सर्वगोड 'मिटलेली कवाडे', बेबी कांबळे 'जीन आमुचं', जनाबाई गिऱ्हे 'मरणकळा', ऊर्मिला पवार 'आयदान' आदी स्त्री आत्मकथा लेखनाची मोठी परंपरा मराठीमध्ये असलेली दिसून येते. या सर्व आत्मकथाकारांनी आपापल्या परिसरातील भाषेचा यथायोग्य वापर करुन प्रमाणभाषा व बोलीभाषेच्या माध्यमातून आपली अनुभव अभिव्यक्ती सिद्ध केलेली दिसून येते. वेगवेगळ्या जाती—जमातींचे भावविश्व रेखाटताना त्या त्या जाती—जमातीत बोलली जाणारी बोली भाषा ही या आत्मकथनातून खऱ्या अर्थाने समृद्धपणे साकार झालेली दिसून येते. एवढेच नव्हे तर आत्मकथा लेखनापासूनच मराठीमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात बोलीभाषेचा वापर करण्याची परंपरा निर्माण झाली हे निर्विवाद सत्य आहे.

## समारोप :

सारांश रूपाने असे सांगता येते की, मराठी दलित साहित्य लेखनाच्या परंपरेमध्ये दलित आत्मकथन हा साहित्य प्रकार अत्यंत नावारूपाला आलेला व वाचकांच्या अभिरुचीला मोह घालणारा साहित्यप्रकार

ठरलेला आहे. या साहित्यप्रकाराच्याद्वारे अनेक लेखकांनी आपल्या जीवनाची अनुभव अनुभूती सिद्ध केलेली आहे. आपले जीवनानुभव व्यक्त करताना लेखकांनी कसलाही मुलाहिजा न बाळगता जे वास्तव आहे ते वास्तव त्याच भाषेतून अत्यंत कलात्मकतेने साकार केल्यामुळे आत्मकथनांना वेगळी आणि महत्वपूर्ण ओळख निर्माण झालेली आहे. आत्मकथनाची भाषाशैली हा विषय खरे तर विद्यापीठ पातळीवरती मोठ्या प्रमाणात संशोधन करण्यासारखा विषय आहे, हे आवर्जून सांगता येते.

## संदर्भ :

१. रा.ग.जाधव, साहित्याचे सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ.२००३, पृ.७८.
२. डॉ.संपतराव गायकवाड, दलित आत्मकथनांचा भाषिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध.
३. डॉ.अविनाश सांगोलेकर, दलित साहित्य : उद्गम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे,प्र.आ.२०१०, पृ.६३.
४. लक्ष्मण माने, उपरा, ग्रंथालय प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८३, पृ.१०३.